# नवे बंध



कालचा सूर्य मावळला
रवी उदयाला येतो आहे
सांडले तृणांवर दंव ते
जे विरून गेले होते

कालचे दु:ख जे आता
हलकेच वाटते आहे
सुख पुन्हा उषेचे वाटे
जे काल लालिमा होते

रक्ताची नाती तुटली
गुंताच वाढतो आहे

हे बंध नव्याने जुळती
जे काल पारखे होते

काळाचा महिमा आहे
दिस दिसामागूनी येतो
झडलेल्या पानामागून
हा नवा धुमारा फुटतो

**- नरेंद्र प्रभू**

http://prabhunarendra.blogspot.com/
http://shabdshabd.blogspot.com/